# सॅम्पल स्वीकृती व परीक्षण फी देयक संबंधित मार्गदर्शक सूची

## १. सर्वसाधारण सूचना

१.१. सॅम्पल (नमुने) सोबत अधिकृत पत्र ज्यामध्ये कोणत्या चाचण्या करावयच्या आहेत व कोणते मानक वापरावे याचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. आपण आपल्या पत्रात अचूक पत्ता व ज्याला अहवाल पाठवायचे आहे त्या संपर्क व्यक्तिचा दूरध्वनी व मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल यांचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१.२. जर वरील माहिती उपलब्ध नसेल तर जी व्यक्ती सॅम्पल घेऊन येईल त्यानी सॅम्पल बिट्रा लॅब कार्यालयात जमा करतेवळी कार्यालयात उपलब्ध असेलेल्या अर्जावर वरील आवश्यक माहिती धावी.

१.३. सॅम्पल व परीक्षण अहवाल बाबतीतील भविष्यातील पत्र्व्यवहार संपर्क व्यक्तीने करावे ज्यानी सॅम्पल बिट्राला पाठविले आहे.

१.४. पत्रात उल्लेख केल्या प्रमाणे सॅम्पल चे परीक्षण केले जाईल.

१.५. आवश्यक परीक्षण करण्यसाठी पुरेसे सॅम्पल असणे आवश्यक आहे. परीक्षण योग्य सॅम्पलची स्वीकृती झाल्यानंतर परीक्षण फी पत्रक दिले जाईल त्यानुसार अहवाल प्राप्त होण्यापुर्वी फी भरणे आवश्यक आहे.

१.६. परीक्षण फीचा संपूर्ण भरणा झाल्याखेरीज परीक्षण अहवाल दिला जाणार नाही. जर काही रक्कम भरणे बाकी असेल तर परीक्षण अहवाल मागण्यापूर्वी कृपया उर्वरीत रकमेचा भरणा करावा.

१.७. जर परीक्षण फीचा भरणा अन्य कोणी करणार असेल तर त्या व्यक्तीचा व्यवहाराचा पत्ता व संपर्कासाठी दूरध्वनी व मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल यांचा तपशील देणे आवश्यक आहे.

१.८. संपर्काचा योग्य तपशील व परीक्षण फीचा भरणा याची पुर्तता झाली असेल तर आम्ही आपणास लवकरात लवकर परीक्षण अहवाल देण्याचा प्रयत्न करू.

## २. फी भरणा बाबतीत सूचना :

२.१ खाली नमुद केलेल्या विविध सोयी नुसार आपण फीचा भरणा परीक्षण फी पत्रक प्राप्त झाल्यानंतर करणे. फी भरणा केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. जसे धनादेश असेल तर त्याची झेरॉक्स प्रत, बँक खात्यामध्ये थेट भरणा केल्यास त्याचा तपशील देणे आवश्यक आहे जेणे करून परीक्षण अहवाल त्वरीत देता येईल.

२.२ फीचा भरणा खालील प्रमाणे करता येईल.

- रोख रक्कम : बिट्रा कार्यालयात
- डिमांड ड्राफ्ट ( डी.डी ) : “ बॉम्बे टेक्स्टाईल रिसर्च असोसिएशन” व्दारा आंध्रा बँक घाटकोपर (पश्चिम ) शाखा, मुंबई च्या नावे.
- व्दारा नेफ्ट /आरटीजीएस : आयएफएस कोड एएनडीबी 0000२३८ (ANDB 0000238)
- खाते प्रकार : वर्तमान (करंट)
- खाते क्रमांक : ०२३८१११00000९00
- एम आये सी आर कोड : ४000११0११
- पॅन क्रमांक : एएएटी ४८६१ डी (AAAT 4861 D)
- टॅन क्रमांक : एम य एम टी 0४१२९ जी (MUMT 04129 G)